25 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : 'शिवस्पंदन २०२३ - २०२४ ' या विद्यापीठस्तरीय कला, सांस्कृतिक स्पर्धेत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने सलग दुसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक उंचावला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारले. दुसऱ्या छायाचित्रात शिवस्पंदन महोत्सवात पारंपरिक सामूहिक नृत्यप्रकार सादर झाले.

# 'संगीत-नाट्यशास्त्र' सलग दुसऱ्यांदा विजेता

## शिवस्पंदन महोत्सवः विविध आठ कला प्रकारांमध्ये स्पर्धा

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठ आयोजित शिवस्पंदन महोत्सवात संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने सलग दुसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांमध्ये विद्यार्थ्यांच्या कला, गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये विद्यार्थी विकास विभागातर्फे सुरू असलेल्या तीन दिवसीय शिवस्पंदन महोत्सवाची आज सांगता झाली.

यास्पर्धेमध्ये समूह नृत्य, एकल नृत्य, लघुनाटिका, सुगम गायन, लोकवाद्य वादन (एकल), समूहगीत, मूकनाट्य, नकला या आठ कला प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या.

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी तीन दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा घेतला. समन्वयक, डॉ. एम. बी. पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते. तत्पूर्वी, लोकवाद्य महोत्सवात ऋषिकेश देशमाने याने देशभरातील 75 लोकवाद्यांच्या वादनाने मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांनी एकल नृत्य आणि समूह नृत्याचे सादरीकरण केले. यावेळी डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. ए. एस. जाधव, डॉ. पी. एम. माने, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. के. डी. मारुळकर, डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. प्रमोद कसबे, डॉ.एस.टी.कोंबडे उपस्थित होते.

### महोत्सवातील विजेते असे

**सुगम गायन** - प्रथम : प्रतीक्षा पवार, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : हर्षदा परीट, इंग्रजी अधिविभाग, तृतीय : ऋचा गावडे, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग

**लोकवाद्यवादन (एकल)** - प्रथम : अमोल बुचडे, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : कौस्तुभ शिंदे, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : प्रेम भोसले, यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंट

**समूहगीत** - प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : पर्यावरणशास्त्र अधिविभाग, तृतीय : डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी

**मूकनाट्य** - प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, तृतीय : पर्यावरणशास्त्र अधिविभाग

**नकला** - प्रथम : शुभांगी जगताप, पर्यावरणशास्त्र अधिविभाग, द्वितीय : प्रेम पवेकर, एम.बी.ए.युनिट, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, तृतीय : श्रेया पाटील, डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी

**लघुनाटिका** - प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : पर्यावरणशास्त्र अधिविभाग, तृतीय : डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी

**एकल नृत्य** - प्रथम : आंबिका पांढरबळे, पर्यावरणशास्त्र अधिविभाग, द्वितीय : विजय आलासे, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : गौरी पाटील, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, उत्तेजनार्थ : श्रेयस पाटील, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, उत्तेजनार्थ : नेहा कलंत्रे, प्राणीशास्त्र अधिविभाग

**समूह नृत्य** - प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : पर्यावरणशास्त्र अधिविभाग, तृतीय : वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग

25 FEB 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगीत, नाट्यशास्त्र अधिविभाग विजेता

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवस्पंदन महोत्सवाच्या सांगता समारंभात स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. विद्यापीठस्तरीय कला, सांस्कृतिक स्पर्धेमध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक पटकावला. या स्पर्धेमध्ये समुह नृत्य, एकल नृत्य, लघुनाटीका, सुगम गायन, लोकवाद्य वादन (एकल), समूहगीत, मुकनाट्य, नकला या आठ कला प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांच्या कला, गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी मागील वर्षापासून सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्पर्धांचे आयोजन केले जाते. या शिवस्पंदन स्पर्धेमध्ये विद्यापीठातील ४० अधिविभागातील विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रत्येकाने अतिशय उत्कृष्ट सादरीकरण केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. समन्वयक डॉ.नितीन कांबळे यांनी तीन दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा सादर केला. समन्वयक, डॉ. एम. बी. पोतदार यांनी सूत्रसंचालन केले.यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

तत्पूर्वी, लोकवाद्य महोत्सवामध्ये देशभरातील ७५ लोकवाद्यांच्या वादनाने मंत्रमुग्ध करणारे सादरीकरण आपल्या खास शैलीत ऋषीकेश देशमाने आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी केले. विद्यार्थ्यांनी एकल नृत्य आणि समूह नृत्याचे उत्साहात सादरीकरण केले. यामध्ये जवळपास ४५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये विद्यार्थी, पालक आणि प्रेक्षकांनी प्रचंड गर्दी केली होती. डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. ए. एस. जाधव, डॉ. पी. एम. माने, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. के. व्ही. मारूळकर, डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. प्रतिमा देसाई, डॉ. प्रमोद कसबे, डॉ. एस. टी. कोंबडे उपस्थित होते.

## शिवस्पंदन महोत्सव : पारितोषिक वितरणानंतर जल्लोष




कोल्हापूर : शिवस्पंदनमध्ये सर्वसाधारण विजेतेपद कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्विकारताना संगीत व नाट्य–शास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी.

### स्पर्धेचा निकाल

**सुगम गायन :** प्रथम प्रतिक्षा पवार संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय हर्षदा परीट इंग्रजी अधिविभाग, तृतीय ऋचा गावडे संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग. **लोकवाद्यवादन (एकल) :** प्रथम अमोल बचडे संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय कौस्तुभ शिंदे संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, तृतीय प्रेम भोसले यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंट . **समुहगीत :** प्रथम संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय पर्यावरणशास्त्र अधिविभाग, तृतीय डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी. **मुकनाट्य :** प्रथम संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, तृतीय पर्यावरणशास्त्र अधिविभाग. **नकला :** प्रथम शुभांगी जगताप पर्यावरणशास्त्र अधिविभाग, द्वितीय प्रेम पवेकर एम.बी.ए.युनिट, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, तृतीय श्रेया पाटील डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी. **लघुनाटिका :** प्रथम संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय पर्यावरणशास्त्र अधिविभाग, तृतीय डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी. **एकल नृत्य :** प्रथम आंबिका पांढरबळे पर्यावरणशास्त्र अधिविभाग, द्वितीय विजय आलासे संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, तृतीय गौरी पाटील उत्तेजनार्थ श्रेयस पाटील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी,नेहा कलंत्रे प्राणीशास्त्र अधिविभाग. **समुह नृत्य :** प्रथम संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय पर्यावरणशास्त्र अधिविभाग, तृतीय वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लोकवाद्य महोत्सवा अंतर्गत वाद्यांचे सादरीकरण करताना विद्यार्थी.

# शिवाजी विद्यापीठात लोकवाद्यांचा गजर

■ वाद्यमहोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने सुरु असलेल्या तीनदिवसीय शिवस्पंदन महोत्सवा अंतर्गत लोकवाद्यांच्या गजराने परिसर न्हाऊन निघाला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशातील ७५ लोकवाद्यांचे वादन आणि प्रदर्शन भरविण्यात आले होते. दीपक बीडकर आणि संदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या उपक्रमात ऋषीकेश देशमाने, शंतनू पाटील, नितीन शिंदे, तेजस गोविलकर, गणेश इंडीकर, मयुरेश शिखरे, अभय हावळ, सुजल कांबळे, कौस्तुभ शिंदे, अनिकेत देशपांडे, प्रशिक कांबळे, प्रतीक जाधव, सुमंत कुलकर्णी, हर्षदा परीट, सूरज कांबळे, धीरज खोत, अक्षय कडोले आणि पृथ्वीराज माळी यांनी विविध वाद्यांचे सादरीकरण केले.

25 FEB 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




**कोल्हापूर : शिवस्पंदन महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते स्वीकारताना संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी.**

# संगीत, नाट्यशास्त्र अधिविभाग दुसऱ्यांदा सर्वसाधारण विजेता

## शिवाजी विद्यापीठ शिवस्पंदन महोत्सव बक्षीस वितरण समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागातर्फे घेण्यात आलेल्या शिवस्पंदन महोत्सवात विद्यापीठस्तरीय कला, सांस्कृतिक स्पर्धेमध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने सलग दुसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक पटकावला. स्पर्धेमध्ये समूह नृत्य, एकल नृत्य, लघुनाटिका, सुगम गायन, लोकवाद्य वादन (एकल), समूहगीत, मूकनाट्य, नकला या आठ कला प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्पर्धेचे पारितोषिक वितरण झाले. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना प्रोत्साहन मिळाले आहे. मागील वर्षापासून सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्पर्धाचे आयोजन केले जात आहे.

स्पर्धेमध्ये विद्यापीठातील ४० अधिविभागातील विद्यार्थी सहभागी झाले होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी तीन दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा सादर केला. समन्वयक डॉ. एम. बी. पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. तत्पूर्वी, लोकवाद्य महोत्सवामध्ये देशभरातील ७५ लोकवाद्यांच्या वादनाने मंत्रमुग्ध करणारे सादरीकरण झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी एकल नृत्य आणि समूह नृत्य सादर केले.

कार्यक्रमामध्ये ४५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ.नंदकुमार मोरे, डॉ. ए. एस. जाधव, डॉ. पी. एम. माने आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2024

पुढारी



कोल्हापूर : युवा संसद स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे. सोबत डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह विद्यार्थी.

# युवा संसद स्पर्धेतील विजेत्यांनी देशविकासात योगदान द्यावे

## कुलगुरू डॉ. शिर्के; युवा संसद स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

युवा संसद स्पर्धेच्या माध्यमातून मिळालेल्या आत्मविश्वासाच्या बळावर विजेत्या विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यात देशाच्या विकासामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

१६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये पश्चिम विभागीय गटात प्रथम क्रमांक मिळविण्याची कामगिरी करणाऱ्या संघातील विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे उपस्थित होते. राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते झाला. शिवाजी विद्यापीठ संघ, समन्वयक व उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांना पुरस्काराने गौरवण्यात आले. या विद्यार्थ्यांनी कुलगुरूंची भेट घेतली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, युवा संसद स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व विकास, लोकशाही मूल्ये रुजविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावते. स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना राजकीय क्षेत्रात कार्य करण्याची आणि त्याद्वारे सामाजिक सेवेमध्ये योगदान देण्याची प्रेरणा मिळाली, तरी स्पर्धेचा हेतू साध्य होईल. स्पर्धेचे विद्यापीठ समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी विद्यापीठ संघाच्या कामगिरीविषयी माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 FEB 2024
तरुण भारत

# युवा संसद स्पर्धेतील विजेत्यांनी देशविकासात योगदान द्यावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

युवा संसद स्पर्धेच्या माध्यमातून मिळालेल्या आत्मविश्वासाच्या बळावर विजेत्या विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यात देशाच्या विकासामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये पश्चिम विभागीय गटात प्रथम क्रमांक मिळविण्याची कामगिरी करणाऱ्या संघातील विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचा परितोषिक वितरण समारंभ नवी दिल्ली येथे भारतीय संसदेच्या बालयोगी सभागृहात पार पडला. कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. शिवाजी विद्यापीठ संघाने दमदार कामगिरी बजावत दुसऱ्यांदा राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली. शिवाजी विद्यापीठ संघ, समन्वयक आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्काराने गौरवले. परतल्यानंतर विद्यार्थ्यांनी कुलगुरूंची भेट घेतली. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, युवा संसद स्पर्धा ही विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व विकास, लोकशाही मूल्ये रुजविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावते. या मूल्यजाणीवा विद्यार्थ्यांनी पुढे आयुष्यभर सोबत बाळगाव्या. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना राजकीय क्षेत्रात कार्य करण्याची आणि सामाजिक सेवेमध्ये योगदान देण्याची प्रेरणा मिळाली, तरी स्पर्धेचा हेतू साध्य होऊन जाईल. समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी कामगिरीविषयी माहिती दिली. पवन पाटील, प्रतीक्षा कांबळे, प्रतीक्षा पाटील, ऋतिका धनगर, आसिया जमादार, श्रेया म्हापसेकर, साईसिमरन घाशी, अनमोल पाटील मनोगत व्यक्त केले.



**कोल्हापूर : सोळाव्या युवा संसद स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत पवन पाटील, प्रतीक्षा कांबळे, प्रतीक्षा पाटील, ऋतिका धनगर, डॉ. प्रल्हाद माने, आसिया जमादार, श्रेया म्हापसेकर, साईसिमरन घाशी, अनमोल पाटील.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2024

तरुण भारत

# विद्यापीठात संत रविदास जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज संत रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव, डॉ. दीपा इंगवले, डॉ. तेजपाल मोहरीकर, डॉ. पी. एन. देवळी, डॉ. ए. इ. मानकर, भरत रावण, युवराज टिपुगडे आदी उपस्थित होते


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2024
सकाळ

# संत रविदास महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शनिवारी संत रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. दीपा इंगवले, तेजपाल मोहारीकर, पी. एन .देवळी, ए. इ. मानकर, भरत रावण, युवराज टिपुगडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2024

पुण्यनगरी



कोल्हापूर : सोळाव्या युवा संसद स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे.

# युवा संसद स्पर्धेतील विजेत्यांनी देशविकासात योगदान द्यावे : कुलगुरू

**कोल्हापूर :** युवा संसद स्पर्धेच्या माध्यमातून मिळालेल्या आत्मविश्वासाच्या बळावर विजेत्या विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यात देशाच्या विकासामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. १६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये पश्चिम विभागीय गटात प्रथम क्रमांक मिळविण्याची कामगिरी करणाऱ्या संघातील विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित होते.

सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचा परितोषिक वितरण समारंभ नवी दिल्ली येथे भारतीय संसदेच्या बालयोगी सभागृहात १६ फेब्रुवारी रोजी पार पडला. संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते हा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. आपल्या विभागात अव्वल कामगिरी केल्यामुळे या कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठ संघ, समन्वयक आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांना पुरस्काराने गौरवण्यात आले होते. या कार्यक्रमानंतर विद्यापीठात परतल्यानंतर या विद्यार्थ्यांनी कुलगुरूंची भेट घेतली. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, युवा संसद स्पर्धा ही विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्त्व विकास, लोकशाही मूल्ये रुजविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावते. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना राजकीय क्षेत्रात कार्य करण्याची आणि त्याद्वारे सामाजिक सेवेमध्ये योगदान देण्याची प्रेरणा मिळाली, तरी स्पर्धेचा हेतू साध्य होईल. यावेळी स्पर्धेचे विद्यापीठ समन्वयक डॉ. प्रल्हाद यांच्यासह पवन पाटील, प्रतीक्षा कांबळे, प्रतीक्षा पाटील, ऋतिका धनगर, आसिया जमादार, श्रेया म्हापसेकर, साईसिमरन घाशी, अनमोल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात हिंदीचे ५ मार्च रोजी राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

हिंदी साहित्यातील सुप्रसिद्ध व्यंगकार हरिशंकर परसाई यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात हिंदी विभागाच्या वतीने ५ मार्च रोजी एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन येथे चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. सुरेश माहेश्वरी (अमळनेर) यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के तर प्रमुख पाहुणे म्हणून प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित राहणार आहेत. चर्चासत्रामध्ये विषयतज्ज्ञ म्हणून डॉ. वृषाली मांद्रेकर (गोवा), डॉ. अरुण गंभीरे (उस्मानाबाद), डॉ. सुनील बनसोडे (जयसिंगपूर), डॉ. सातापा सावंत (सांगली) मार्गदर्शन करणार आहेत. समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व अध्यक्षस्थानी डॉ. अर्जुन चव्हाण उपस्थित राहणार आहेत. चर्चासत्रास उपस्थित राहण्याचे आवाहन प्र. विभागप्रमुख डॉ. ए. एम. सरवदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात २६ पासून राष्ट्रीय विज्ञान सप्ताह

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात येत्या २६ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त सप्ताहभर विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यंदा 'विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान' हा विषय घेण्यात आला असून त्याच अनुषंगाने तज्ज्ञांची व्याख्याने, प्रकल्प स्पर्धा व अन्य उपक्रम आयोजित केल्याची माहिती इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पवन गायकवाड आणि डॉ. समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते सोमवार (दि. २६) रोजी सकाळी १०.३० विज्ञान दिन समारंभाचे उद्घाटन होईल.

25 FEB 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैवाहिक समस्या, कुटुंब कलह सोडविण्यासाठी विद्यापीठाचे पाऊल

## अधिसभेची फॅमिली अँड मॅरेज कौन्सिलिंग कोर्सला मंजुरी



### रोजगाराच्या नवीन संधी



खासगी पातळीवर समुपदेशकांकडून समुपदेशन करून घेणे फार खर्चिक आहे. विद्यापीठाच्या वतीने सुरू होत असलेल्या नव्या कोर्समुळे तरुण समुपदेशक तयार होतील. तरुण समुपदेशक इतरांचे शास्त्रीय पद्धतीने समुपदेशन करू शकतील. याच्या माध्यमातून नव्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

दिवसेंदिवस विभक्त कुटुंब पद्धतीने निर्माण होणारे कलह, विवाहांमधील समस्यांमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. यासाठी शिवाजी विद्यापीठाने विधायक पाऊल उचलले असून फॅमिली अँड मॅरेज कौन्सिलिंग कोर्स सुरू करण्यास मान्यता दिली आहे. यामुळे कुटुंब आणि विवाह संस्थेला बळकटी मिळण्यास मदत होणार आहे.

पुढारी विशेष

व्यक्ती हाच कुटुंबाचा भाग असून त्याची जडणघडण कुटुंबातच होते. मात्र, गेल्या काही वर्षांत कुटुंब संस्थेत महत्त्वाचे बदल झाले असून व्यक्ती आत्मकेंद्री बनत चालली आहे.

एकत्र कुटुंबपद्धती कमी होऊन विभक्त कुटुंबे दिसत आहेत. यामुळे जुन्या जाणत्या माणसांचे अनुभव, मार्गदर्शन मिळणे अवघड झाले असून कुटुंबातील संवाद खंडित होत आहे.

विवाह हा व्यक्तिगत विषय असला तरी यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे पडसाद कुटुंब व समाजव्यवस्थेवर उमटत आहेत. विवाहाबाबत मुला-मुलींच्या अपेक्षा वाढलेल्या, त्यातून निर्माण होणारे ताणतणाव, त्याचे घटस्फोटात पर्यवसान या गोष्टी समाजाच्या दृष्टीने गंभीर आहेत. २०२३ मध्ये क्षुल्लक व किरकोळ पान ४ वर

"फॅमिली अँड मॅरेज कौन्सिलिंग कोर्स समाजाच्या स्वास्थ्यासाठी अत्यंत उपयोगी आहे. शिवाजी विद्यापीठाने अधिसभेत मान्यता देऊन लोकाभिमुख विद्यापीठ होण्याच्या दृष्टिकोनातून पाऊल उचलले आहे. या कोर्समुळे तरुणांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यावर त्यांचे नैराश्य कमी होईल ते भावी जीवन सुखी होईल.

**- डॉ घनश्याम दीक्षित,**
अधिसभा सदस्य, शिवाजी विद्यापीठ

# वैवाहिक समस्या, कुटुंब कलह सोडविण्यासाठी विद्यापीठाचे पाऊल

(पान १ वरून) कारणावरून कोल्हापूर जिल्ह्यात २२० हून अधिक घटस्फोटाची प्रकरणे समोर आली आहेत. यासाठी समुपदेशन काळाची गरज बनली आहे.

व्यक्ती व कुटुंबाचे समुपदेशन करणाऱ्या संस्थांचे प्रमाण कमी आहे. याचा विचार करूनच कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने फॅमिली अँड मॅरेज कौन्सिलिंग कोर्स सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यास अधिसभेने मंजुरी दिली आहे. यानंतर हा प्रस्ताव विद्यापरिषद व नंतर व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवला जाणार आहे. समाजशास्त्र विभाग, मानसशास्त्र विभाग व स्त्री अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा अभ्यासक्रम चालवला जाणार आहे.

या कोर्समध्ये कुटुंब आणि विवाहित जोडपे यांचे समुपदेशन केले जाणार आहे. लग्न संस्थेतील सर्व घटकांचे समुपदेशनदेखील होणार आहे. गावोगावी जाऊन समुपदेशक सामाजिक समुपदेशनाचे काम करतील. यातून सामाजिक स्वास्थ्य सुधारण्यास हातभार लागणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2024
तरुण भारत

# 'मराठा स्वराज्य निर्मिती'वर उद्या शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाच्या वतीने सोमवार २६ रोजी राजर्षी शाहू सिनेट सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागातील माजी विभागप्रमुख आणि मराठा इतिहासाच्या ज्येष्ठ इतिहास संशोधिका प्रा. डॉ. सुमित्रा कुलकर्णी 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा, स्वराज्याची संकल्पना व त्यांच्या राज्याची निर्मिती आदी बाबींवर मार्गदर्शन करणार आहेत.

25 FEB 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात मंगळवारी आदिवासी समावेशन विषयावर परिषद



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने २७ व २८ फेब्रुवारी रोजी 'अमृतकाळ आणि भारतातील आदिवासींचे समावेशन' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

या परिषदेचे उद्घाटन प्रा. सोनझारिया मिंज यांच्या बीजभाषणाने होणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के आहेत. ही परिषद विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये होईल. परिषदेचा समारोप प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थितीत होणार आहे. करण्यात आले आहे. तरी प्राध्यापक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी इत्यादींनी उपस्थित रहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

25 FEB 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शासकीय कार्यालयांत फुकटचे पाणी; महापालिकेची होतेय आर्थिक हानी

## ३० कोटी थकविले; १७० नळ कनेक्शनची पाणीपट्टी २३ कोटी अन् ३३ मिळकतींचा घरफाळा ७ कोटी; महापालिका चालणार कशी?

कोल्हापूर : सतीश सरीकर

फेब्रुवारी संपत आल्याने सर्व शासकीय कार्यालये कर वसुली टार्गेट पूर्ण करण्यासाठी धडपडत आहेत. महापालिकेचाही त्यात समावेश आहे. परंतु, सर्वसामान्यांकडून सक्तीने वसुली आणि जप्तीची कारवाई करणाऱ्या शासकीय कार्यालयांनीच महापालिकेचे तब्बल ३० कोटी रु. थकवले आहेत. यात पाणीपट्टी २३ कोटी आणि घरफाळ्याच्या ७ कोटींचा समावेश आहे. शहरातील बहुतांश शासकीय कार्यालये अक्षरशः फुकट पाणी वापरत आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात शासकीय कार्यालये थकबाकी ठेवत असतील तर महापालिका प्रशासन चालणार कसे? शहरवासीयांना सेवासुविधा मिळणार कशा? असा प्रश्न निर्माण होत आहे.

### मनपाच्या नोटिसांना केराची टोपली

पाणीपट्टी आणि घरफाळा हेच कोल्हापूर महापालिकेचे मुख्य आर्थिक स्रोत आहेत. यावर महापालिकेचा आर्थिक डोलारा अवलंबून आहे. मात्र, शहरातील अनेक शासकीय कार्यालयांकडे महापालिकेच्या कराची थकबाकी आहे. शासकीय कार्यालये असल्याने महापालिका प्रशासन नोटिसा पाठविण्याशिवाय काहीही करू शकत नाही. महापालिकेने अनेकवेळा नोटिसा पाठवूनही संबंधित शासकीय कार्यालयांतील अधिकारी त्या नोटिसांना केराची टोपली दाखवत आहेत. मात्र, त्यांच्या कार्यालयांचा पाणी बिलाचा आणि कराचा बोजा महापालिकेवर म्हणजेच कोल्हापूरकरांच्या डोक्यावर बसत आहे.







### ...तर मनपावर कर्जाचा डोंगर होईल

विशेष म्हणजे संबंधित शासकीय कार्यालयांना पाणीपट्टीसह इतर कर भरण्यासाठी वर्षाला निधी मिळत असतो. तरीही त्यांच्या कार्यालयाकडून महापालिकेचे कर भरण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे. परिणामी, आता महापालिका प्रशासनानेच कठोर पावले उचलून जप्तीसारखी कारवाई करण्याची गरज आहे. त्यासाठी प्रसंगी कोल्हापुरात असलेल्या वेगवेगळ्या कृती समित्यांनीही महापालिकेला पाठिंबा देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. अन्यथा हद्दवाढ नाही आणि शासकीय कार्यालयाकडून पाणीपट्टीसह इतर कर नाहीत. अशाने महापालिकेवर कर्जाचा डोंगर उभा राहील.

### एवढी कसली उदासीनता?

महापालिका प्रशासनाने पाणीपट्टी थकबाकीदारांसाठी सवलत योजना राबवली. यात एकरकमी पाणीपट्टी आणि विलंब आकार भरल्यास ५० टक्के सवलत देण्यात आली. ठराविक कालावधीनंतर ही सवलत ३० टक्के केली. त्याविषयी आयुक्तांच्या स्वाक्षरीने थकबाकी सर्व शासकीय कार्यालयांच्या प्रमुखांना पत्रे पाठवून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. परंतु, त्यालाही संबंधित कार्यालयाच्या प्रमुखांनी प्रतिसाद दिला नाही. एवढी कसली ही उदासीनता? असा प्रश्न विचारला जात आहे.

### पाणीपुरवठा थकबाकी

| | |
|---|---|
| १२ ग्रामपंचायती - | ८,८६,४८,६४३ रु. |
| सीपीआर - | ७,०६,४२,६५३ रु. |
| रेल्वे विभाग - | २,४२,९२,६२९ रु. |
| पाटबंधारे, वारणा - | १,४४,४०,२४७ रु. |
| शिवाजी विद्यापीठ - | १,०२,३०,७८० रु. |
| पाटबंधारे, पंचगंगा - | ९६,३५,११२ रु. |
| सार्व. बांधकाम विभाग - | ७९,२८,३७४ रु. |
| जिल्हाधिकारी कार्या. - | २८,९८,०८६ रु. |
| जिल्हा परिषद कार्या. - | १६,२५,१८१ रु. |
| सीपीआर अधिष्ठाता - | १५,०५,७६७ रु. |
| वन विभाग - | १३,०४,१५३ रु. |
| टेलिफोन विभाग - | १२,०५,६६१ रु. |
| **एकूण -** | **२३,४३,५७,२८६ रु.** |

### घरफाळा थकबाकी


- अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (सिंचन विभाग) - २,६५,५३,७९७ रु.
- सहा. कार्यकारी अभियंता, दूधगंगा डावा कालवा विभाग क्र. ३ - १,०९,०७,२५२ रु.
- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - ९९,१२,६३१ रु.
- कार्यकारी अभियंता, तुळशी डावा कालवा, सिंचन भवन - ६२,५६,२१८ रु.
- महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड, कोल्हापूर - १५,५९,१४९ रु.
- उपसंचालक, नगररचना कार्यालय, कोल्हापूर - १७,३६,८२४ रु.
- अधीक्षक, शेंडा पार्क, कुष्ठधाम - १४,०३,११४ रु.
- उपविभागीय कृषी अधिकारी - १२,६८,७३३ रु.
- महाराष्ट्र शासन कामगार राज्य विमा योजना - ११,११,०८९ रु.
- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था - १०,३४,०५७ रु.
- शाहू छत्रपती औद्योगिक प्रशिक्षण संस्था - ९,१७,८७८ रु.
- सहा. संचालक आरोग्य सेवा हिवताप - ६,६६,१८२ रु.
- सब पोस्ट ऑफिस, गूळ मार्केट यार्ड - ५,१०,८७५ रु.
- व इतर असे एकूण - ६,९०,५७,३७१ रु.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2024
तरुण भारत

# खेलो इंडिया विद्यापीठ जलतरण स्पर्धेत पृथ्वीराजला रौप्य

प्रतिनिधी
कोल्हापूर

गुवाहाटी (आसाम) येथे सुरु असलेल्या चौथ्या खेलो इंडिया विद्यापीठ गेम्सअंतर्गत आयोजित जलतरण स्पर्धेच्या, १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात कोल्हापूरच्या पृथ्वीराज डांगेने रौप्य पदक पटकावले. झाकीर हुसेन स्वामिंगपुलमध्ये ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत पृथ्वीराजने पदकाला गवसणी घालण्यासाठी १०० मीटरचे अंतर १ मिनिट ५ सेकंदात पार केले. स्पर्धेत कर्नाटकातील जैन विद्यापीठाच्या धनुष्य एस. याने सुवर्ण तर मुंबई विद्यापीठाच्या जय एकबोटेने कांस्य पदक पटकावले. पृथ्वीराज हा



शिवाजी विद्यापीठाच्या संघातून स्पर्धेत सहभागी झाला होता. त्याला शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्यासह जलतरण संघ प्रशिक्षक पृथ्वीराज सरनाईक व व्यवस्थापक डॉ. महेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.